दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

u RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २५३ वा | रविवार दि. ९ जुलै २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## दुसऱ्या फळीतील नेत्यांनाही मोठं केलं पाहिजे: मंत्री पाटील

**मुंबई ।** राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री अनिल पाटील यांनी शरद पवारांवर निशाणा साधला आहे. तसेच यांनी यावेळी बोलतांना म्हटलं की, 'आता दुसऱ्या फळीतील नेत्यांना देखील मोठं करायला हवं.' मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर अनिल पाटील हे पहिल्यांच त्यांच्या जळगावच्या मतदार संघात आहेत. तसेच यावेळी अनिल पाटील यांचे त्यांच्या कार्यकर्त्यांकडून जोरदार स्वागत देखील करण्यात आले आहे. पण यावेळी माध्यमांशी बोलतांना त्यांनी शरद पवार यांच्यावर टीका केली आहे.



## न्यूज कॉलम

### वीज पडून दरखेंड्यात बैल ठार

**धुळे ।** शिंदखेडा तालुक्यात एक महिन्यानंतर मॉन्सूनचे आगमन झाले आहे. काही पावसाने हजेरी लावली आहे. दरखेंडा येथे वीज पडून बैल ठार झाला आहे. दरखेंडा येथील अमृत रंगराज पवार यांच्या गावशिवारातील शेतात वीज पडून ७० हजार किमतीचा बैल ठार झाला आहे.

### सौंदाणेत ३५ हजाराची घरफोडी

**धुळे ।** बंद घराच्या लाकडी दरवाजाचा कडीकोयंडा तोडून चोरट्यांनी ३५ हजार रूपयाची रोकड लंपास केली. धुळे तालुक्यातील सौंदाणे येथे घडली. याबाबत सुनिल वसंत वाघ, रा. वसंत कॉलनी, रेल्वे स्टेशनसमोर धुळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचे सासरे मधुकर दगडू पाटील रा. सौंदाणे ता. जि. धुळे हे हैद्राबाद येथे गेलेले होते. यादरम्यान अज्ञात व्यक्तीने बंद घराचा लाकडी दरवाज्याला असलेला कडीकोयंडा तोडून घरात प्रवेश केला. यावेळी किचन रूममधील तुरीची डाळ असलेल्या ॲल्युमिनियमच्या डब्यात ठेवलेली ३५ हजार रूपयांची रोकड अज्ञात व्यक्तीने लंपास केली. याप्रकरणी सदर अज्ञात व्यक्तीविरूध्द मोहाडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सर्व बंडखोर आमदारांचा पराभव होणार : शरद पवारांचे सूचक वक्तव्य

**नाशिक । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अजित पवार यांच्या समर्थक आमदारांनी बंड करून पक्षात फूट पाडल्यानंतर पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची आज नाशिक जिल्ह्यातील येवला विधानसभा मतदारसंघात सभा होत आहे. शरद पवार यांच्या राज्यव्यापी दौऱ्याची सुरुवात भुजबळ यांच्या येवला येथून होत असून या सभेसाठी नाशिकमध्ये पोहोचलेल्या पवारांनी सभेआधी पत्रकार परिषद घेत बंडखोर नेत्यांनी केलेल्या आरोपांवर जोरदार पलटवार केला आहे. तसंच आपल्या दौऱ्याला सुरुवात करण्यासाठी नाशिकचीच निवड का केली, यामागचं कारणही त्यांनी सांगितलं आहे.

नाशिक हा जिल्हा नेहमीच काँग्रेसी विचारांचा राहिला आहे. आमच्या सर्वांचे गुरू आणि प्रेरणास्थान असलेल्या यशवंतराव चव्हाण यांनाही या जिल्ह्याने बिनविरोध संसदेत पाठवलं होतं. त्यामुळे नवीन कामाला सुरुवात करताना मी या जिल्ह्याची निवड केली,फ असं शरद पवार यांनी म्हटलं आहे. तसंच आजची सभा मी टीका-टिप्पणी करण्यासाठी घेत नसल्याचंही पवारांनी स्पष्ट केलं आहे. मुंबईत ५ जुलै रोजी घेतलेल्या मेळाव्यात अजित पवार यांनी पक्षातील नेते जितेंद्र आव्हाड यांच्यामुळे पक्षातील अनेक नेते पक्ष सोडून गेले, असा आरोप केला होता. यावर बोलताना शरद पवार यांनी अजित पवारांना टोला लगावला आहे. मज्या व्यक्तीने कधीही भाजपसोबत चला, अशी मागणी केली नाही, त्याने पक्षाचं नुकसान झालं की ज्यांनी भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला त्यांनी पक्षाचं नुकसान केलं?फ असा खरमरीत सवाल पवारांनी उपस्थित केला आहे. आजची सभा ही टीका-टिप्पणी करण्यासाठी नसल्याचं शरद पवार यांनी सांगितलं असलं तरी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलताना पवार यांनी छगन भुजबळ यांना केलेल्या मदतीची आठवण करून दिली आहे. मात्र ते विधानसभेत असावेत यासाठी मी येवला या आमच्या विचारांच्या मतदारसंघातील सहकाऱ्यांशी चर्चा करून भुजबळ यांना इथे आणलं. आता जे आमच्यापासून बाजूला गेले त्यांच्याबद्दल आम्ही काही ठरवणार नाही, लोक ठरवतील,फ असं ते म्हणाले.



### सुप्रियाला नव्हे इतरांना संधी दिली

**शरद पवार पुढे म्हणाले की, आता ते सुप्रियाविषयी बोलत आहेत. तुम्हीच तुलना करा. एकाला तीन-चारवेळा उपमुख्यमंत्री व एकदा मंत्रीपद दिले. आणि दुसऱ्याला एकही असे महत्त्वाचे पद दिले नाही. केंद्रीय पातळीवर राष्ट्रवादी काँग्रेसचा नेत्याला मंत्रीपदाची संधी मिळाली, तेव्हा आम्ही सूर्यकांता पाटील यांना संधी दिली. त्यावेळी सुप्रिया सुद्धा खासदार होती. त्यानंतर पक्षाला दुसऱ्यांदा संधी मिळाली, तेव्हा पी ए संगमा यांच्या मुलीला संधी देण्यात आली. तेव्हाही सुप्रिया संसदेत उपस्थित होत्या. त्यानंतर तिसऱ्या वेळी प्रफुल्ल पटेल यांना संधी देण्यात आली. पण मी सुप्रियाला एकदाही मंत्रीपदाची संधी दिली नाही, असे पवार म्हणाले.**

### अजित पवारांना काही कमी केले नाही

**अजित पवारांनी बंडखोरी करताना ते तुमचे पुत्र नाहीत म्हणून त्यांना संधी मिळाली नाही, असा आरोप केला. हे सर्वकाही उत्तराधिकारी निवडल्यामुळे घडले का? असा प्रश्न पत्रकारांनी शरद पवारांना केला होता. त्यावर शरद पवार म्हणाले. माझी यावर जास्त बोलण्याची इच्छा नाही. विशेषत: कुटुंबाशी संबंधित मुद्यावर मला फार बोलायाचे नाही. ते मला आवडतही नाही. केवळ एकच गोष्ट मी तुमच्या निदर्शनास आणू इच्छितो की, अजित पवार यांना सुरुवातीला राज्यमंत्री म्हणून जबाबदारी मिळाली. त्यानंतर त्यांना कॅबिनेट मंत्री केले. एवढेच नाही तर त्यांना तीन ते चारवेळा उपमुख्यमंत्री म्हणूनही संधी दिली.**

### आकडा महत्वाचा नाही...

**माझ्यासोबत आमदारचा आकडा किती हे महत्वाचा नाही. २३ राज्याचे पदाधिकारी आमच्यासोबत असून ते कार्यकारिणी बैठकीत होते. नाशिक जिल्ह्याचा वैशिष्ट्य असा आहे की आमचे विचार पटणारे मतदार आहेत. लोकशाही टिकवायची असेल तर विरोधी पक्ष राहिले पाहिजे. मात्र विरोधी पक्ष राहिला नाही पाहिजे, असं भाजप करत आहे. कोणी फेरविचार करायचा असेल तर त्यांनी करावा, असा सल्लाही अजित पवार गटाला उद्देशून दिला आहे. तसेच राजकारणात मी कोणाला शत्रू मानत नाही, विचार वेगळे असतील. तसेच जितेंद्र आव्हाड, जयंत पाटील यांनी पक्षासाठी मोठं काम केलं आहे.**

### ढोल ताशांच्या गजरात शरद पवारांचे स्वागत

**राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी राज्यभर सभा घेणार असल्याचे जाहिर केले आहे. विशेषत: राष्ट्रवादी सोडून गेलेल्यांच्या मतदार संघात शरद पवार सभा घेणार आहेत. याच अनुशंगाने ते आज नाशिकमध्ये दाखल झाले आहेत. शरद पवार यांच्या समर्थकांनी त्यांचे ढोल ताशांच्या गजरात जंगी स्वागत केले आहे. तरूण कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.**

## बस- ट्रकच्या धडकेत नऊ जण जखमी

**सोनगीर । प्रतिनिधी**

सोनगीर जवळ बस व ट्रक यांची धडक होऊन झालेल्या अपघातात बसचालकासह नऊ जण जखमी झाले. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सोनगीर पोलिसात अपघाताची नोंद झाली.

बसपुढे चालणारा ट्रक अचानक थांबल्याने बस ट्रकच्या मागे जाऊन धडकली. बस चालकाच्या प्रसंग सावधानतेमुळे मोठा अनर्थ टळला. आज सकाळी अकराच्या सुमारास परिवहन महामंडळाची धुळे-शिरपूर बस (एम एच ४०/एन ९०२८) प्रवासी घेऊन मुंबई आग्रा महामार्गावरून धुळ्याकडे जात होती. सोनगीर फाट्याच्या पुढे हॉटेलभाऊ जवळ बसचा अपघात झाला. बसच्या पुढे चालणाऱ्या ट्रक (एनएल०१/०५०२) चालकाने अचानक ब्रेक दाबल्याने तो थांबला. आपल्या पुढे चालणारा ट्रक अचानक थांबल्याचे लक्षात येताच बस चालकाने निकराचे प्रयत्न केले, बस थांबवण्याचा प्रयत्न केला, पण तरीही बस ट्रकच्या मागील बाजूवर जाऊन धडकला. परंतु बसचा वेग मात्र नियंत्रणात



आला, अपघातात बसच्या पुढील काचा फूटून दर्शनी भागाचे नुकसान झाले.

बसमधील प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली. प्रताप शंकरराव मोरे (वय ४८ रा. लौकी), बेबाबाई पांडुरंग बोरसे (वय ४५ रा. कापडणे), दिपाली कृष्णदास पाटील (वय ४२), प्रतिभा राजाराम पाटील (वय ५५), सुनंदा गुलाबराव निवृत्ती पाटील (वय ५५), सुशीला ममराज जाधव (वय ४५), मंगला रमेश पाटील (वय ५८, सर्व रा. शिरपूर), बंडूसिंग पिरिया पावरा (वय ३२ रा. वकवाड) प्रवासी किरकोळ जखमी झाले. जखमी प्रवाशांना सोनगीर टोल नाक्याच्या म्बुलन्सने येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॉ. प्रफुल्ल फुलपगारे, त्यांच्या सहकाऱ्यांनी जखमी प्रवासींवर उपचार केले. अपघात झाला त्यावेळेस बसमध्ये ६० प्रवासी असल्याची माहिती महिला वाहकाने दिली. या अपघाताची सोनगीर पोलिसात नोंद झाली.

## प्रवाशांच्या जीवाशी खेळणाऱ्या मद्यधुंद बसचालकावर गुन्हा

**धुळे ।** बसस्थानकातून गुजरात राज्यातील वापीकडे जाणारी बस मद्यधुंद अवस्थेत चालकाने चालविल्याने त्याचेवर धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. धुळे बसस्थानकातून चालक दीपक सुधाकर शिंदे या बसचालकाने एम.एच.२०/बी.एल.३७४७ क्रमांकाच्या बसचा ताबा घेतला.सुसाट वेगाने बस पळविण्यास सुरूवात केली. त्यामुळे बसमधील प्रवाशांना चालक मद्यधुंद अवस्थेत असल्याचा संशय आला. वाहकासह प्रवाशांनी त्यास हटकले असता तो काही एक ऐकण्याच्या मनःस्थितीत न दिसल्याने तो दारूच्या नशेत बस चालवित असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. परिणामी, प्रवाशांनी मोठा गोंधळ घातला. त्यामुळे साक्री तालुक्यातील नेर येथे बस थांबवून वाहतूक निरिक्षक प्रवीण गलाबराव पाटील यांनी बसचालकाची चौकशी केली असता तो मद्यधुंद अवस्थेत असल्याचे निष्पन्न झाले.

## लाखोंचा बोगस खतसाठा पकडला

### कृषी विभाग, मोहाडी पोलिसांची संयुक्त कारवाई

**धुळे । प्रतिनिधी**

एमआयडीसी येथील एका कंपनीवर कृषी विभागाच्या भरारी पथकाने छापा टाकत बोगस रासायनिक खतांचा प्रचंड साठा पकडला. सुमारे ८०० बॅग रासायनिक दाणेदार खत या कारवाईत कृषी विभागाच्या पथकाला मिळाले असून, बॅग सिल करण्याचे मशिनही हस्तगत करण्यात आले आहे. लाख्खो रुपये किंमतीचा हा खत साठा चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आला आहे. या कारवाईमुळे धुळे जिल्ह्यात बोगस खतांचा पुरवठा शेतकर्यांना होत असल्याचे समोर आल्याने खळबळ उडाली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार शनिवारी दुपारी विभागीय कृषि विभागाच्या पथकाने जिल्हा गुणवत्ता नियंत्रक तायडे यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांच्या पथकासह धुळे एमआयडीसीतील एका कारखान्यावर छापा टाकला. या ठिकाणी रासायनिक खत बॅग मध्ये भरून सील पॅक करण्याचे काम सुरू असल्याचे आढळून आले. या



कारवाई विषयी भरारी पथकातील अधिकार्यांनी अधिक माहिती दिली. त्यांनी सांगितले की, ग्रीन फिल्ड ॲग्रो टेक इंडस्ट्रीज, ता. कर्हाड, जि. सातारा असा पत्ता असलेल्या कंपनीचे रासायनिक खत १८-१८-१० हे कृषि राजा आणि कृषि सम्राट या दोन ब्रॅण्ड नावाने विक्री करण्याच्या उद्देशाने रिकाम्या बॅगांमध्ये भरण्याचे काम येथे सुरू असल्याचे आढळले आहे.

हे रासायनिक खत बोगस असण्याची दाट शक्यता आहे. कारण खत उत्पादक कंपनीने माल सील बंद करूनच विक्रेत्यांना पाठवायचा असतो, असा नियम आहे. परंतु येथे रिकाम्या बॅगांमध्ये खत भरले जात असल्याचे आढळले आहे. ८०० हून अधिक भरलेल्या बॅगा आणि काही रिकाम्या बॅगा खतांचा साठा, बॅग सील करण्याचे मशिन येथे मिळून आले आहे. मिळालेल्या रासायनिक खताच्या गुणवत्तेची तपासणी सह पुढील कारवाई सुरू करण्यात आली आहे. १२३५ रुपये १ बॅग या प्रमाणे सुमारे १० लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. बॅग मोजणी सह पुढील कारवाई सुरू असल्याचे यावेळी कृषि विभागाच्या पथकातील अधिकार्यांनी सांगितले. दरम्यान या कारवाईमुळे एमआयडीसी परिसरात खळबळ उडाली आहे. खरीप हंगाम सुरू झालेला असतांना धुळे जिल्ह्यात शेतकर्यांना बनावट रासायनिक खत विक्री करण्यात येत असल्याचा संशय यामुळे व्यक्त केला जात आहे. शेतकर्यांची फसवणूक करून कृषि उत्पादनांवर मोठा परिणाम होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. कृषि विभागाच्या पथकाच्या कारवाईकडे लक्ष लागले आहे.

## जवान मनोज माळी यांच्यावर आज अंत्यसंस्कार

**धुळे । प्रतिनिधी**

सिक्कीम येथे कर्तव्यावर असताना वीरमरण प्राप्त झालेले वाघाडी (ता. शिरपूर) गावाचे सुपुत्र असलेले जवान मनोज संजय माळी यांचे पार्थिव रविवारी (दि.९) वाघाडी येथे दाखल होणार आहे. त्यानंतर सकाळी १० वाजता त्यांची अंतिम यात्रा काढण्यात येणार असून त्यानंतर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.



मनोज माळी हे एनसीसीचे अंडर ऑफिसर व सैन्य दलातील १६९ मिडियम रेजिमेंट येथील लान्स नायक म्हणून कार्यरत होते. दि. ५ जुलै २०२३ रोजी रात्री घडलेल्या दुर्घटनेत त्यांना वीरमरण प्राप्त झाले आहे. मनोज माळी यांचे पार्थिव दिल्ली येथून रेल्वेने औरंगाबाद येथे आणले जात आहे. सैन्यदलाच्या विशेष वाहनाने दि. ९ रोजी सकाळी वाघाडी येथे हे पार्थिव आणले जाईल. सकाळी १० वाजता मनोज माळी यांची अंतिम यात्रा काढण्यात येईल. त्यानंतर त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. दरम्यान, काल शिरपूर तहसीलदारांनी वाघाडी येथे भेट देऊन जवान मनोज माळी यांच्या कुटूंबियांची भेट घेतली. तसेच अंत्यसंस्काराच्या नियोजनाबाबत पाहणी केली. अंत्यसंस्काराप्रसंगी वीर जवानास मानवंदना देण्यासाठी सैन्यदलाचे खास अधिकारी धुळ्यात दाखल होणार आहेत.

## राहूल गांधींवर खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या भाजपा सरकारचा काँग्रेसतर्फे निषेध



**धुळे । प्रतिनिधी**

देशाचे नेते राहूलजी गांधी यांच्या वक्तव्याबाबत गुजरातच्या एका भाजपा नेत्याने मा.गुजरात न्यायालयात बदनामीचा खोटा आरोप करत दाखल केला होता. या प्रकरणात न्यायालयाने दोन वर्षाची शिक्षा सुनावली. खोट्या केसेस करुन केंद्रातील भाजपा सरकार लोकशाहीत तोंड बंद करण्याच्या प्रकाराचा निषेध धुळे शहर व जिल्हा काँग्रेसच्यावतीने करण्यात आला. यावेळी आ.कुणाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस भवनासमोर निदर्शने करण्यात आली.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि, काँग्रेसचे देशाचे नेते राहूल गांधी यांनी केलेल्या वक्तव्याप्रकरणी दाखल केलेल्या खटल्यात गुजरात उच्च न्यायालयाने राहूल गांधी यांच्या शिक्षेला स्थगिती देण्यास नकार दिला आहे. लोकशाही विरोधात आवाज उठविणार्यांचा भाजपा सरकार आवाज बंद करीत आहे. राहूल गांधी यांनी मोदी आणि अदानी यांच्या भ्रष्ट्र युतीचा पर्दाफाश केल्याने त्यांचे तोंड बंद करण्यासाठी त्यांचावर खोटे आरोप करीत गुजरात न्यायालयात खटला दाखल केला. भाजपा सरकारचा हा लोकशाहीचा आवाज गळा घोटण्याचा प्रकार असल्याचे सांगत धुळे शहर काँग्रेसचे अध्यक्ष डॉ.अनिल भामरे यांच्यासह जिल्हा व धुळे शहर काँग्रेस, युवक काँग्रेसच्या पदाधिकार्यांनी धुळ्यातील काँग्रेस भवनसमोर भाजपा सरकारविरुध्द निदर्शने केली.यावेळी शहर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल भामरे, ज्येष्ठ नेते रमेश श्रीखंडे, काँग्रेसचे प्रदेश सचिव युवराज करनकाळ, मनपाचे माजी विरोधी पक्ष नेते साबीर खान, इंटक जिल्हाध्यक्ष प्रमोद सिसोदे, मुकूंद कोळवले, बापू खैरनार, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गणेश गर्दे,पंकज चव्हाण, किशोर देसले, किरण नगराळे, बानुबाई शिरसाठ, मच्छिंद्र येरडावकर, दिपक पाटील, राजेंद्र खैरनार, प्रकाश शर्मा,मधुकर मरसाळे, इलियास अन्सारी, बशीर अहमद, इम्तियाज पठाण, सौ.अलकाबाई बिर्हाडे, भटू महाले, लहू पाटील, असिफ अन्सारी, साजिद अन्सारी, सुरेश बैसाणे, हरीभाऊ चौधरी आदी उपस्थित होते.

## जिल्हा परिषदेतर्फे यंग टॅलेंट हुडकण्याचे काम सुरु : मित्तल

### आयमाच्या पुढाकाराने वाय २० मंथन शिबिर संपन्न

**नाशिक । प्रतिनिधी**

सुपर ५० कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील शाळांमधील गुणी रत्ने (यंग टॅलेंट) हुडकून काढण्यासाठी जिल्हा परिषदेने पुढाकार घेतला आहे. या यंग टॅलेंटला आकार देणे, सर्वगुणसंपन्न करण्याचे काम सुरू झाले आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

अंबड इंडस्ट्रीज ॲंड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (आयमा), यंग इंडियन्स आणि केंद्र सरकारच्या युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने नाशकात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विविध क्षेत्रातील युवा उद्योजकांसाठी प्रेरणादायी वाय २० मंथन शिबिर आयमाच्या सभागृहात पार पडले. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल बोलत होत्या.

व्यासपीठावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून आयमाचे अध्यक्ष निखिल पांचाळ, पॉला मॅकग्लेन आणि सुनील खांडबहाले उपस्थित होते. ग्रामीण भागातील यंग टॅलेंटला सर्व क्षेत्रात सक्षम बनवायचे असेल तर सरकार आणि इंडस्ट्री यांनी हातात हात घालून काम करण्याची गरज आहे. सरकारपुढे अनेक जबाबदाऱ्या आहेत. त्यामुळे हे कार्य सिद्धिस न्यायचे असेल तर स्वयंसेवी संस्थानी त्यासाठी पुढे आले पाहिजे, असेही मित्तल पुढे म्हणाल्या.





यशस्वी उद्योजक व्हायचे असेल तर तरुणांनी नव्या बदलांना सामोरे जाण्याची तसेच नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्याची तयारी ठेवावी. सेमी कंडक्टर आणि मेडिकल इंडस्ट्री या क्षेत्रात नवीन पिढीने स्वतःला झोकून दिल्यास भारताचे भवितव्य निश्चितच उज्वल राहील, असे आवाहन आयमाचे अध्यक्ष निखिल पांचाळ यांनी केले. हा पहिलाच मोठा कार्बन न्यूट्रल उपक्रम आहे. उद्योग क्षेत्रात नव्या उमेदीने कार्य करण्याची नवी प्रेरणा यामुळे युवकांना मिळेल. तसेच यामुळे उद्योग जगतात नवे कृतीशील पर्व सुरु होईल, असा विश्वासही पांचाळ यांनी व्यक्त केला.

दुसऱ्या सत्रात डिजिटायजेशनचे फायदे तोटे यावर गुलबदन टॉकीज आणि भारतीय डिजिटल पार्टी (भादिपा) च्या मुख्य कार्यकारी अधिकारी पॉला मॅकग्लेन आणि सुनील खांडबहाले यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी आपले अनुभव कथन करून उपस्थितांची दाद मिळवली. दिल्लीत याच महिन्यात जी-२० परिषद असून त्याचा पार्श्वभूमीवर यंग इंडियन्सतर्फे देशभरातील ६३ शहरांमध्ये अशा प्रकारचे उपक्रम राबवून तरुणांमध्ये उद्योजकतेबाबत जागृती निर्माण करण्याचे काम केले जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## एक लाखाची मागणी करणाऱ्या वनपाल, वनरक्षकासह खाजगी पंटरविरुद्ध गुन्हा

### नाशिक येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

**शहादा । प्रतिनिधी**

एक लाखाची लाचेची मागणी करणाऱ्या तालुक्यातील दरा येथील वनपाल, वनरक्षक व खाजगी पंटरविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, यातील तक्रारदाराच्या लहान भावावर वन्यजीव संरक्षण अधिनियम अन्वये शहादा वनपरिक्षेत्र कार्यालय येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्यात तक्रारदाराच्या भावास अटकही करण्यात आली आहे. या दाखल गुन्ह्यात तसेच जामीन मिळण्यास मदत करण्यासाठी शहादा येथील खाजगी पंटर नदीम खान पठाण याने दरा येथील वनपाल संजय मोहन पाटील व वनरक्षक दीपक दिलीप पाटील यांच्यासाठी दि. ८ मे २०२३ रोजी तक्रारदाराकडून दोन लाख रुपये लाचेची मागणी केली. तडजोडीअंती दि. ९ मे रोजी त्यांनी एक लाख रुपये लाचेची मागणी करून स्वीकारण्याचे मान्य केले. त्याला वनपाल व वनरक्षक यांनी प्रोत्साहन दिले. तसेच सरकारी वकीलाकरिता २५ हजार रुपये लाचेची मागणी केली म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शिवसेनेतील अस्वस्थता

भाजपने राष्ट्रवादीलाही जवळ केल्याने भाजपला साथ देण्यात आमची चूक झाली, अशी भावना शिवसेनेच्या आणि अपक्ष आमदारांमध्ये निर्माण झाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर अजित पवार आणि शरद पवार यांच्या गटामधील कुरघोड्यांचे राजकारण शिगेला पोहोचले आहे. अजित यांनी दोन दिवसांपूर्वीच पक्षावर दावा सांगितला असताना दिल्लीत राष्ट्रवादीच्या कार्यकारिणीच्या बैठकीत शरद पवार हेच पक्षाचे अध्यक्ष असल्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. कार्यकारिणीच्या बैठकीत खासदार प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि अजित पवार यांच्यासह ८ मंत्र्यांवर अपात्रतेची कारवाई करण्यात आली. राष्ट्रवादीत या घडामोडी घडत असतानाच अजित पवार गटाला शिंदे-फडणवीस यांच्या सरकारमध्ये सामावून घेतल्यानंतर युतीमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले. वर्षभरापूर्वी मुख्यमंत्री शिंदे यांच्या सोबत शिवसेनेतून बंड करून भाजप सोबत सरकारमध्ये सामील झालेल्या आमदारांना आता आपल्या भविष्याची चिंता लागली आहे. त्यांची अवस्था सांगताही येत नाही आणि सहनही होत नाही अशी झाली असल्यास नवल नाही. मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर शिवसेना आणि भाजपला प्रत्येकी नऊ मंत्रिपदे मिळाली. उर्वरीत विस्तारात आपल्याला मंत्रिपदे मिळतील याकडे बर्याच आमदारांचे डोळे लागले असतानाच आता राष्ट्रवादीचा अजित पवारांचा गट त्यात वाटेकरी झाला आहे. अजित यांच्यासह ९ जणांनी मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर आता उर्वरीत मंत्रिमंडळ विस्तारात आपले काय होणार याची चिंता शिवसेनाच नव्हे, तर भाजपमधील आमदारांना लागली आहे. मंत्रिमंडळात ४३ मंत्रिपदे उपलब्ध आहेत. हे लक्षात घेता आता केवळ चौदा मंत्रिपदे रिकामी आहेत. मंत्रिपदावर डोळा ठेवून असलेल्यांना आता मुकावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यातूनच दोन दिवसांपूर्वी शिंदे यांच्या शिवसेनेतील नाराजी नाट्य पाहायला मिळाले. मुख्यमंत्री शिंदे राजीनामा देणार असल्याच्याही परवा दिवसभर अफवा पसरवल्या गेल्या. नाराज आमदारांची समजूत काढताना २०२४च्या निवडणुकीपर्यंत मुख्यमंत्री बदलणार नाही, तुम्ही निश्चिंत राहा, असे आश्वासन शिंदे यांनी दिले खरे; पण मंत्रिमंडळ विस्ताराबद्दल मात्र त्यांनी मौन पाळणे पसंत केले.

अजित पवार युतीमध्ये आले. त्यांच्या रूपाने एक आक्रमक नेता महायुतीत सहभागी झाला, महायुतीची ताकद त्यामुळे वाढेल, असे मुख्यमंत्री शिंदे आपल्या पक्षाच्या आमदारांना सांगत असले तरी वर्षभरापूर्वी एकत्रित शिवसेनेतून बंड करून बाहेर पडलेल्या अनेकांना आपल्या वाट्याला काय आले? असा प्रश्न पडला आहे. महाविकास आघाडीच्या उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये राष्ट्रवादीकडून आपली अडवणूक होते, अर्थमंत्री असलेल्या अजित पवारांकडून आमदारांच्या निधी वाटपात अन्याय होतो, अशी कारणे शिवसेनेकडून दिली गेली होती. मुख्यमंत्री आमचा; पण कामे मात्र राष्ट्रवादीची होतात अशी शिवसेनेची त्यावेळी भावना होती. आता त्याच राष्ट्रवादीसोबत काम करण्याची वेळ पुन्हा शिवसेनेवर आली आहे. मग बंड कशासाठी असा प्रश्न आता ठाकरे गटाकडून उपस्थित केला जाऊ शकतो. शिवसेनेतल्या त्या बंडाच्या नैतिकतेवरही प्रश्न चिन्ह उभे केले जाऊ शकते. शिवसेनेचे संजय शिरसाठ आणि प्रहार संघटनेचे बच्चू कडू यांना मंत्रिपदे मिळालेली नाहीत. त्याबद्दलची नाराजी ते सातत्याने व्यक्त करीत आहेत. राष्ट्रवादी सत्तेत आल्यामुळे महत्वाच्या खात्यावरही पाणी सोडावे लागेल, ही भीती शिवसेनाच नव्हे, तर भाजपलाही सतावते आहे. आगामी निवडणुकीत तिकीट वाटपातही अनेकांना आपली उमेदवारी प्रतिस्पर्धी गटातील उमेदवाराला मिळणार का? याची भीती आहे. राष्ट्रवादीच्या उमेदवारांशी लढत दिलेल्या शिवसेना-भाजपच्या उमेदवारांचे काय? याची साशंकता निर्माण झाली आहे. दोन्ही पक्षांतील बंडामुळे उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना मिळणार्या सहानुभूतीचे आव्हानही महायुतीला पेलावे लागणार आहे. भाजपने केलेल्या फोडाफोडीचे राजकारण हा मुद्दा ठाकरे आणि शरद पवार यांच्या गटाकडून उचलला गेला, तर महायुतीला त्याचा प्रतिवाद करणे अवघड होणार आहे. शांत, संयमी स्वभावाचे मुख्यमंत्री शिंदे आणि आक्रमक स्वभावाचे अजित पवार यांच्यात समतोल राखण्याचे काम आता देवेंद्र फडणवीस यांनाच करावे लागणार आहे.

# नाविन्यपूर्ण शोध व तंत्रज्ञानातून रोजगार निर्मिती



भारतासारख्या दिडशे कोटी लोकसंख्येच्या देशासाठी रोजगार निर्मिती हे स्वातंत्र्य प्राप्ती पासून मोठेच आव्हान राहिले आहे. ग्रामीण भागातील दुष्काळग्रस्त व अभावग्रस्त लोकांना दिलासा देण्यासाठी रोजगार हमी योजनेसारख्या योजना आल्या. परंतु लोकांच्या आकांक्षा व आर्थिक स्वावलंबन देणारी रोजगार निर्मिती न झाल्यामुळे संपूर्ण भारतात दिल्ली व आजूबाजूचा परिसर ,पुणे मुंबई व बंगलुरू या तीन ठिकाणी लोकसंख्येचे केंद्रीकरण होऊन भारताच्या लोकसंख्येच्या १५ ते २० टक्के लोकसंख्या या तीन ठिकाणी एकवटली आहे व अजूनही दररोज त्यात वाढ होत आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर जिल्ह्याच्या ठिकाणी ,तालुक्याचे ठिकाणी व अगदी ग्रामीण भागात महिना वीस हजार रुपये पेक्षा जास्त पगाराच्या नोकऱ्या कुठेही उपलब्ध नाहीत. त्यामुळे गावातून,तालुक्यातून, तसेच जिल्ह्याच्या शहरी भागातून प्रत्येक घरातील मुलगा पुणे, मुंबई ,बंगलुरू, दिल्ली या तीन शहरात विस्थापित झालेला दिसतो. तसेच परदेशात शिक्षण घेऊन तेथेच स्थायिक होण्याचा कल दिवसेंदिवस वाढतो आहे. आधुनिक रोजगार निर्मितीचे तत्वज्ञान सांगते की, आता रोजगार निर्मितीसाठी फार मोठ्या पायाभूत सुविधांची गरज नाही. अमेरिकेत गेल्या शतकापासून तेथील विद्यापीठे नवीन तंत्रज्ञान व शोध यावर भर देत आहेत. तेथील उद्योगधंदे विद्यापीठातील संशोधनावर फार मोठ्या प्रमाणावर पैशाची गुंतवणूक करतात. विद्यापीठातून दरवर्षी शेकड्यांनी नवीन तंत्रज्ञानावर आधारित कंपन्या तयार होतात आणि त्यातून रोजगार निर्मिती होते. आपण भारतातही आजूबाजूला नजर टाकली तर टॅक्सी सेवा, फूड डिलिव्हरी सेवा, ऑनलाइन खरेदीच्या सेवा यासारख्या कितीतरी सेवातून आधुनिक रोजगाराची निर्मिती झाली आहे. संपूर्ण भारतात अर्बन बेल्ट मधील लोकसंख्येचे केंद्रीकरण थांबवायचे असेल तर आपल्याला आधुनिक तंत्रज्ञान व शोधासाठी व त्यातून निर्माण होणाऱ्या रोजगारासाठी प्रयत्न करावे लागतील. यासाठी विद्यार्थी, पालक, शिक्षक व सरकार यांना एकत्रित प्रयत्न करावे लागतील. मुळात स्मरणशक्तीवर आधारित इंग्रजांनी कारकून तयार होण्यासाठी तयार केलेली शिक्षण पद्धती आपल्याला सोडून द्यावी लागेल. कौशल्यावर आधारित शिक्षण पद्धतीचा अवलंब करावा लागेल. आठवी ते दहावी शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला आयुष्याकरता आवश्यक एक तरी जीवन कौशल्य आत्मसात करून त्यात निपुण होता आले पाहिजे. सोळाव्या वर्षी प्रत्येक विद्यार्थ्याने त्याच्या चरितार्थासाठी त्या कौशल्यावर आधारित काम सुरू केले पाहिजे. समाजाच्या उद्योगधंद्याच्या गरजा ओळखल्या पाहिजेत. त्यावर आधारित संशोधन व लोकांचे जीवन अधिक सुसह्य करणाऱ्या तंत्रज्ञान शोधण्याकरता शाळा, कॉलेज ,विद्यापीठ यातून निरंतर प्रयत्न झाले पाहिजेत. त्यातूनच आधुनिक लोकांना स्वावलंबी करणारी तसेच पुणे मुंबई इतकेच वेतन देणारी, रोजगाराची निर्मिती स्थानिक स्तरावर होऊ शकेल. मुळात आपली लोकसंख्या हीच खरंतर आपले बलस्थान आहे .२० ते ५० वयोगटातील ७५ कोटी लोक आपल्या लोकसंख्येत आहेत. त्यामुळे संपूर्ण जगातल्या सर्व प्रकारच्या गरजा पूर्ण करण्याकरता या ७५ कोटी लोकांचे हात कसे वापरले जातील याचा विचार आपण केला पाहिजे. पायाभूत सुविधांची निर्मिती झाल्याने रोजगार हमी योजनेच्या खड्डे खना,रस्ते तयार करा यासारख्या योजनांमधून फारसे आता साध्य होण्यासारखे राहिले नाही. आपल्या जवळच्या बांगलादेश सारख्या देशांनी संपूर्ण जगात रेडीमेड गारमेंट क्षेत्रात गरुड भरारी घेतली आहे. त्यामुळे बांगलादेशात फार मोठी रोजगाराची निर्मिती झाली आहे. स्थानिक स्तरावर जगभराच्या गरजेनुसार कौशल्य विकास करून तेथे मालाची निर्मिती होते. त्याची जगभर निर्यात केली तर फार मोठ्या प्रमाणावर रोजगाराची निर्मिती होऊ शकते. संपूर्ण जगात सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची गरज पुढच्या पंचवीस वर्षात असणार आहे. त्यासाठीच संपूर्ण भारतातील आठवी नंतरच्या विद्यार्थ्यांना तंत्रस्नेही केले पाहिजे .या क्षेत्रात पुढील दहा वर्षात पाच कोटी नवीन रोजगारांची निर्मिती भारतात होणे शक्य आहे. जेव्हा पाच कोटी रोजगार निर्मिती होते तेव्हा त्या निगडित सर्विस इंडस्ट्रीला पुन्हा दोन कोटी माणसे लागतात. म्हणजे ७५ कोटी रोजगाराची आवश्यकता असलेल्या लोकांपैकी दहा टक्के लोकांना फक्त इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी क्षेत्रात रोजगार मिळू शकतो .याचा आपण विचार केला पाहिजे. नोकरी करता शिक्षण ही जगभर कालबाह्य झालेली पद्धत आहे. मग शिक्षण कशा करता? शिक्षण आधुनिक तंत्रज्ञान निर्मितीसाठी! शिक्षण संशोधनासाठी! शिक्षण लोकांच्या क्रयशक्तीला वाव देण्यासाठी! शिक्षण आधुनिक उद्योगधंदे उभे करण्यासाठी! शिक्षण सर्व समावेशक सर्वांसाठी उत्तम जीवन जगण्याची प्रेरणा देणारे व त्याची गरज पूर्ण करणाऱ्या रोजगार निर्मितीसाठी! मग हे सर्व कशातून साध्य होणार ? यासाठी आठवीपासूनच संशोधन प्रकल्प तयार करणे, कौशल्य वाढवणे ,नाविन्यपूर्ण विचार करणारी शिक्षण पद्धती आपल्याला उभी करावी लागेल. यासाठी *शाळा, महाविद्यालय विद्यापीठे यांनी आपली कालबाह्य शिक्षण पद्धती सोडून रोजगार निर्मितीसाठी शिक्षण सुरू केले तर त्यातूनच मुंबई पुणे सारख्या अर्बन बेल्ट मधील स्थलांतर थांबेल. चला तर मग या साठी यासाठी एकत्रितपणे जगभरच्या उत्तम विद्यापीठात काय चालले आहे हे समजून घेऊया व आपणही त्या दिशेने वाटचाल करूया!



शब्द संवाद
प्राचार्य प्रशांत पाटील
(नाशिक) मो.९५११८५९९३९

## आत्मिक प्रदूषण - संत राजिन्दर सिंह जी महाराज

आपण सर्वजण बाह्य प्रदूषणांविषयी खूप काही जाणतो की, ते कशाप्रकारे आपल्या शरीराला हानिकारक आहे. परंतु आत्म्याच्या प्रदूषणाविषयी आपल्याला काहीही माहिती नसते. बाह्य प्रदूषणाविषयी जेव्हा आपण बोलतो, तेव्हा सर्व लोक सावध रहातात परंतु, आत्मिक प्रदूषणा बाबतीत काहीच लक्ष देत नाहीत. आपले शरीर स्वस्थ राहण्याकरिता ज्या प्रकारे वातावरणाची स्वच्छता व शुद्धी होणे खूपच गरजेचे आहे, ठीक अशाच प्रकारे आपल्या आत्म्याला स्वस्थ ठेवण्याकरिता आपले अंतःकरण शुद्ध ठेवणे फारच गरजेचे आहे.

बाहेरील हवा आणि पाण्याप्रमाणेच आपल्या आत्म्याची सुद्धा स्वाभाविकपणे पवित्रता आणि सुंदरता असली पाहिजे. आपला आत्मा परमेश्वराचा अंश आहे. सर्व महापुरुष समजावून सांगतात, प्रभू प्रेमाचा महासागर आहे, आपला आत्मा त्याचा अंश असल्याकारणाने प्रेम पूर्ण आहे आणि प्रभूप्राप्तीचा मार्ग सुद्धा प्रेमच आहे. काळजीपूर्वक पाहिले असता, लाखोंकरोडो वर्षांपासून आपल्याला स्वच्छ हवा आणि पाणी मिळत आहे परंतु पृथ्वीवर यांचा आवश्यकतेपेक्षा जास्त उपयोग होत असल्याकारणाने, या प्राकृतिक साधनांची कमतरता होत आहे. आपण हवा, पाणी आणि पृथ्वीवरील आवरणांचा इतका वाईट उपयोग केलेला आहे की, इथे रहाणे दिवसें-दिवस कठीण होत चालले आहे. इतपत की, आपण जंगले तसेच पशुपक्षांचा विनाश करून सारे वातावरण प्रदूषित केले आहे. ठीक अशाच प्रकारे आपल्या इतर इंद्रियांच्या भोगलालसेमुळे आपला आत्मा सुद्धा प्रदूषित झालेला आहे.


आपल्यापैकी बरेचसे लोक विचार करतात की, आपण मस्तिष्काद्वारे ज्ञान प्राप्त करतो. आपला मेंदू कम्प्युटरच्या एका यंत्राप्रमाणे आहे, ज्याकडे आपलं मन आपले विचार पाठवीत असते. आपण या मेंदूद्वारे बाह्य जगताचे ज्ञान प्राप्त करीत असतो. आपले शरीर आणि मन यांना चालवणारी शक्ति आपला आत्मा आहे. आपल्या आत्म्याचे नियंत्रण आपल्या मनावर आणि मनाचे नियंत्रण इंद्रियांवर असायला हवे होते परंतु वस्तुस्थिती मात्र याच्या उलट आहे. आपला आत्मा मनाच्या वर्चस्वाखाली संसारिक विषय विकारांमध्ये लिप्त झालेला आहे.



या भौतिक विश्वातील सुंदर दृश्य, सुवास, स्वाद आणि आकर्षणांनी आपले लक्ष त्याच्याकडे वेधून घेतले जाते, जे आपल्या आत्म्याचे बाह्य स्वरूप आहे. आपल्या शरीराच्या नऊ दरवाजाद्वारे आपले लक्ष बाह्य जगताकडे जाते, हे नऊ दरवाजे म्हणजे दोन डोळे, दोन कान, दोन नासिका, मुख, गुदद्वार व् मूत्रद्वार. आपले मन इंद्रियांच्या वशीभूत झाल्याने आपला आत्मा या भौतिक जगतातील आकर्षणांमध्ये फसला आहे. याच कारणाने आपण आपल्या वास्तविक आत्मिक रूपाला विसरलो आहोत.

आपण आपले जीवन भौतिक आनंद आणि इंद्रियांच्या भोग रसांमध्ये नष्ट करत आहोत. आपल्यापैकी सर्वसाधारण लोकांच्या जीवनाचा उद्देश केवळ संसारीक वस्तू जमा करणे जसे की - धन दौलत, मौल्यवान वस्तू, नातीगोती, नाव-लौकिक इत्यादी. परंतु आपण हे विसरलो की, मृत्यू समयी यातील कोणतीही वस्तू आपल्या सोबत येणार नाही. हा केवळ आपल्या दृष्टिकोनाचा धोका आहे. ज्याप्रमाणे वाळवंटात पसरलेली रेती दुरून पाण्याच्या तलावासारखी भासते, त्याच प्रकारे हे विश्व सुद्धा आपल्या बाह्य डोळ्यांनी पाहताना खरोखरचे वाटते परंतु, आयुष्यभर आपण याच भ्रमात राहतो. या दुनियेतील सर्व वस्तू कायमस्वरूपी आपल्याबरोबर राहतील परंतु, या विश्वातील कोणतीही वस्तू ना आपल्याबरोबर येते, ना आपण बरोबर घेऊन जाऊ शकतो.या गोष्टीची जाणीव फार उशिरा म्हणजेच, जेव्हा आपण वृद्ध होतो तेव्हा आपल्याला माहिती पडते की, आपल्या आत्म्यावर संसारिक विषय विकार अथवा मनमायेचे पडदे पडलेले आहेत. युगां- युगे या विश्वात परत परत येण्या जाण्याने आपल्या आत्मा संसारिक भोग विलासांच्या मलीनतेमुळे प्रदूषित झालेला आहे. आपण त्याच्या मूळ स्वरूपाला विसरलो आहोत. परंतु केवळ काही भाग्यवानांनाच आत्मिक जागृतीचा अनुभव होतो. त्यांना अशी जाणीव होते की, जीवनामध्ये अध्यात्मिकतेचे खास महत्व आहे. जे त्यांना शाश्वत जीवन प्राप्त करण्याची इच्छा अथवा जीवन व मृत्यूचे रहस्य उलगडण्यात मदत करते.

## शब्दकोडे-११६



आडवे शब्द

१. तिन्ही त्रिकाळ! ८. गोड १०. नम्रतेने झुकलेला ११. रात्रीचा पाऊस १२. स्थूल, भरपूर १४. जोरदार बुक्का १६. सुगंध पसरणे १८. ठराविक ठसा १९. युद्ध, लढाई २१. उत्सव २२. मारुतीचा वार २५. खरकट्याचा ढीग २७. एक तारवाद्य ३०. छोटी गाय ३२. अंतरिक्ष प्रवासी ३४. अधिक श्रेष्ठ, वरचढ ३६. संगीतातील ठेका ३७. नाम घोष ३८. हात ३९. केस ४१. टक, दृष्टी ४३. विझवणे ४४. शिकारीचा प्राणी ४६. आईवडील ४७. रमापती ४८. उगीच ५१. च्या समक्ष, च्या देखत ५२. कापडाचा एक प्रकार ५३. ढाक्याचे प्रसिद्ध कापड ५५. धागे विणून कापड तयार करण्याचे साधन ५७. विकार ५८. सरसकट ६०. गाय ६१. भार ६३. सोन्याचा कस ६४. महाभारतातील खादाड राक्षस ६६. समुद्र ६७. कोल्हापूरची महालक्ष्मी ६९. केर ७१. जाडसर पीठ ७३. श्वासोच्छश्वास ७५. मध ७६. पुष्पदल ७७. दर्पण ७८. मेंढपाळ

उभे शब्द

१. कायदेशीर २. करंजीच्या कडा कापणारी ३. मर्यादा, सीमा ४. निमग्न, गुंग ५. संभाषणाने हा साधला जाईलच असे नाही! ६. तोंडी लावण्याचा पदार्थ ७. वेडावाकडा वाढणारा एक औषधी कंद ८. निर्बुद्ध ९. अतिरेक करून सांगणे (वाक्य प्रचार) १२. गणपतीचे एक नाव १३. अर्धांगवायू १५. बैलाच्या गळ्यातील दोर १७. सैन्याचा दाणागोटा २०. जुगाराचा एक प्रकार २३. फक्त, केवळ २४. खोडण्याचे साधन २६. मकर २७. सूट २८. अशक्त २९. शहानिशा ३१. वेलींची बाग ३२. काजळ, सुरमा इ. ३३. शूर मुलाची आई ३४. जप्ती ३५. आवेशाने पुढे जाणे ३८. अगदी क्षुल्लक ४०. त्वरित ४२. उपवासाचा कंद ४५. नवरदेव ४८. त्वरित समर्पक उत्तर देणारा ४९. अनुत्तीर्ण ५०. बडबड, त्रास ५१. सारखा ५२. पतंगाचा धागा ५३. थडगे, कबर ५४. खोटा, तात्पुरता ५६. गाजावाजा ५७. नादिरा नायिका असलेला दिलीप कुमारचा चित्रपट ५९. एकदम, पटकन ६२. सोन्याचा धागा ६५. चंद्र ६६. वाहन हाकणारा ६८. परमेश्वर ७०. पालव ७२. छिद्र ७४. शुभ्र प्राणी ७५. नंतर

### शब्दकोडे ११५ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.साक्षरता अभियान ६.गीता रहस्य ९.रेती १०.रन ११.माता १२.कार १४.मकान १५.कमान १६.अनाकलनीय १८.मवाळ २०.सअ २२.सजीव २४.पर २५.नकार २७.वहेदा २९.भगदा ३१.धसका ३३.मावळा ३४.नल दमयंती ३६.निदान ३७.वर ३८.मीन ४०.नालायक ४२.रसरशीत ४४.तरतुद ४७.वारा ४८.भाल ५०.मर ५१.सुखकर्ता दुखहर्ता ५६.राजकुमार ५८.रवाना ५९.चातक ६०.पसा ६२.सकाम ६४.गडकरी ६५.गतकालीन ६९.दमणीय ७१.सम ७३.मवाळ ७४.वासलात ७५.वहाड ७७.विनर ७८.नीट ८०.नस ८१.कानन ८३.कपाट ८४.परसदार ८५.निरवता

**उभे उत्तर**

१.सारेगामपधनी २.क्षती ३.तारका ४.अननस ५.याचक ६.गीता ७.रकाना ८.हरकत ११.मानस १३.राणी १४.मळ १६.अवहेलना १७.यशोदा १९.वारसदार २१.अनवरत २३.जीवन २६.काळा २८.दादला २९.भयंकर ३०.गती ३२.कानस ३३.मावशी ३५.मयत ३९.नखरा ४१.गदर ४३.रजर्ता ४५.तुम ४६.असुर ४७.वार्ता ४८.भाजक ४९.लकु ५२.खवा ५३.कना ५४.दुख ५५.हलका ५६.रातराणी ५७.मकडहाड ६०.परीस ६१.कली ६३.मदतनीस ६५.गम ६६.तवा ६७.काळवीट ६८.नवार ७०.यवन ७२.महानता ७६.-हास ७९.टदा ८१.कार ८२.नव

## बोगस शाळांचा बंदोबस्त हवा

देशाचे धडाडीचे आणि दूरदृष्टीचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्तेवर आल्यापासून गेल्या ९ वर्षांत देशभरात अनेक विकासांचे असे अभिनव प्रकल्प राबविऱ्यास सुरुवात केली. या विकास प्रकल्पांची गंगा अगदी तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचविण्यास त्यांनी प्राधान्य दिले. विशेष म्हणजे कोणताही प्रकल्प असो तो केवळ कागदावर न राहता त्याची अंमलबजावणी योग्य तऱ्हेने व्हावी आणि त्याचा लाभ सर्व संबंधितांना व्हावा याबाबत ते कटाक्षाने काळजी घेण्याचे आदेश देतात. त्यामुळे कोणताही प्रकल्प असो त्याची अंमलबजावणी योग्य तऱ्हेने केली जाते आणि त्याचा लाभ सर्वांना कसा होईल याची कसोशीने काळजी घेतली जाते. त्यामुळेच जनसामान्यांचा त्यांच्यावरील आणि त्याच्या सरकारवरील विश्वास वाढला आहे. यापूर्वी कित्येक वर्षे देशात, राज्यात काँग्रेसची सरकारे होती. पण त्या काळात चांगल्या, सार्वजनिक प्रकल्पांची अंमलबजावणी योग्य तऱ्हेने न झाल्याने पुरता बोजवारा उडाल्याचे चित्र दिसत होते. तसेच त्यावेळच्या सरकारचा आणि लोकप्रतिनिधींचा योजना राबविण्यापेक्षा त्यातून मलिदा कसा कमावता येईल याकडे जास्त लक्ष दिले गेल्याने, केवळ भ्रष्टाचार अधिक बोकाळला आणि चांगल्या चांगल्या योजनांचा पुरता बोजवारा उडालेला दिसला.

पंतप्रधानांनी देशातील जनता शिक्षित व्हावी, विशेषतः मुलींनी शिक्षण घेऊन स्वत:च्या पायावर उभे राहावे यासाठी 'सर्व शिक्षा अभियान' राबविताना 'स्कूल चले हम'चा नारा देत हे अभियान यशस्वी करण्याच्या दिशेने मार्गक्रमण केले. मात्र या अभियानास तडा जाऊ शकेल अशा काही घटना घडत असल्याने चिंता वाढली आहे. शिक्षण प्रसारावर भर देताना शाळांच्या उभारणीस चालना देण्यात आली. मात्र हे करताना काही नतद्रष्टांनी अनधिकृत म्हणजेच बोगस शाळाही सुरू केल्या. या बोगस शाळांची संख्या वाढू लागल्याने सर्व शिक्षणासारख्या पवित्र आणि अत्यंत महत्त्वाच्या अशा अभियानावर विपरित परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अशा शाळांना हुडकून त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना मुंबई महापालिका प्रशासनाने आणि राज्य शासनाने दिल्यानंतर आता अशा कारवाईला प्रारंभ झाला आहे.

मुंबईत अनधिकृत शाळा बंद करण्याचे आदेश शिक्षण आयुक्तांनी देऊनही २१० पैकी १८६ अनधिकृत शाळा बंद झालेल्या नाहीत. महत्त्वाची बाब म्हणजे या सर्व शाळांना प्रत्येकी एक लाख रुपये दंड भरण्याची नोटीस एप्रिल महिन्यात बजावण्यात आली होती. नोटिशीनुसार १५ दिवसांत हा दंड भरणे अपेक्षित होते.

**क्रमशः**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# मंत्री छगन भुजबळ यांचे नाशकात पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून पुष्पवर्षाव करत वाजत-गाजत जल्लोषात स्वागत

## फुले, शाहू,आंबेडकरांच्या विचारांवर आपली वाटचाल कायम सुरूच राहील– ना. छगन भुजबळ







**नाशिक । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांचे, मजुरांचे, बेरोजगारांचे, महिलांचे, ओबीसींचे प्रश्न सोडविण्यासाठी तसेच राज्याच्या विकासासाठी आपले काम अविरत सुरु राहणार असून छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आपली वाटचाल कायम सुरूच राहील असे प्रतिपादन राज्याचे नवनियुक्त मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

राज्याच्या मंत्री मंडळात कॅबिनेट मंत्री पदी शपथ घेतल्यानंतर मंत्री छगन भुजबळ हे काल पहिल्यांदा नाशिक जिल्हा दौऱ्यावर आले. मुंबईतून सांताक्रुझ येथील निवासस्थान येथून नाशिककडे निघाल्यावर ठाणे, मुलुंड, मानकोली नाका, कल्याण जंक्शन राजनोली, वाशिंद, इगतपुरी, घोटी, रायगड नगर, शहरातील पाथर्डी फाटा येथे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटक्याची आतषबाजी करत फुलांचा वर्षाव करून वाजतगाजत जंगी स्वागत केले. त्यानंतर भुजबळ फार्म येथे जल्लोषात स्वागत झाल्यावर येथील कार्यालयात त्यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या भेटी घेऊन उपस्थितांना संबोधित केले. यावेळी त्यांच्या समवेत माजी खासदार समीर भुजबळ व माजी आमदार पंकज भुजबळ हेही होते.

यावेळी माजी खासदार देविदास पिंगळे, शहराध्यक्ष रंजन ठाकरे, जिल्हाध्यक्ष ड.रवींद्र पगार, माजी आमदार जयवंतराव जाधव, संजय पवार, शिवराम झोले, नानासाहेब महाले, पंढरीनाथ थोरे, दिलीप खैरे, बाळासाहेब कर्डक, आनंद सोनवणे, कैलास मुदलीयार, विष्णुपंत म्हैसधूने, वसंत पवार, गोरख बोडके,अंबादास खैरे, समाधान जेजुरकर, गणेश डोमाडे, रमेश पालवे, प्रेरणा बलकवडे, योगिता आहेर, कविता कर्डक, प्रकाश लोंढे, सुरेखा निमसे, जगदीश पवार, प्रवीण बनकर, डॉ.योगेश गोसावी, सचिन कळमकर, मोहन शेलार, दिपक गोगड, प्रकाश वाघ, शशी हिरवे, रवी हिरे, नाना पवार, संजय खैरनार, अमोल थोरे, आशा भंदूरे, पूजा आहेर, किशोरी खैरनार, मीनाक्षी काकळीज, अमर वझरे, सागर मोटकरी, मकरंद सोमवंशी यांच्यासह हजारोंच्या संख्येने नाशिक शहर व जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते स्वागतासाठी हजार होते.उपस्थितांना संबोधित करतांना मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, राज्यभरातील पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव अजितदादा व आम्ही सर्व सहकाऱ्यांनी हे पाऊल उचललं. हा प्रसंग येऊ नये म्हणून एकदा नाही अनेकदा प्रयत्न केले. मात्र हा निर्णय आम्हाला घ्यावा लागला. राज्यातील शेतकऱ्यांचे, मजुरांचे, बेरोजगारांचे, महिलांचे, ओबीसींचे प्रश्न सोडविण्यासाठी कटीबद्ध असून सरकारच्या माध्यमातून राज्यातील जनतेसाठी विविध विकास कामे करण्यात येतील असे ते म्हणाले. उपस्थित जनसमुदायाचे आभार मानत यापुढील काळातही सर्व लोक आमच्या पाठीशी राहाल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.ना. छगन भुजबळ यांचे नाशिक शहरात पाथर्डी फाटा परिसरात आगमन होताच पाथर्डी फाटा ते भुजबळ फार्म पर्यंत वाजत गाजत मिरवणूक काढत जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी क्रेनच्या सहायाने मोठा पुष्पहार घालण्यात आला. तसेच रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या नागरिकांकडून फुलांचा वर्षाव करत स्वागत केले. दरम्यान नाशिक शहरात पाथर्डी फाटा येथे आगमन झाल्यानंतर त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत विनम्र अभिवादन केले. यावेळी युवकांनी बाईक रैली काढत त्यांचे स्वागत केले.



# ऑनक्वेस्टची नाशिक स्पेशालिटी लॅबोरेटरीसोबत हातमिळवणी

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतातील अग्रगण्य सुपर-स्पेशलाइज्ड लॅबोरेटरी नेटवर्क असलेल्या ऑनक्वेस्ट लॅबोरेटरीज लिमिटेडने महाराष्ट्रातील आपले कामकाज वाढविण्यासाठी नाशिक स्पेशालिटी लॅबोरेटरीसोबत हातमिळवणी केली आहे. या धोरणात्मक सहकार्याचे उद्दीष्ट उत्तर-पश्चिम महाराष्ट्रातील चिकित्सक आणि रुग्णालयांच्या प्रगत चाचणी गरजा पूर्ण करणे, कर्करोग निदान आणि विशेष चाचणीच्या क्षेत्रात एक प्रमुख खेळाडू म्हणून ऑनक्वेस्टचे स्थान मजबूत करणे आहे. काल ८ जुलै रोजी नाशिक येथे झालेल्या पत्रकार परिषदेत या युतीची अधिकृत घोषणा करण्यात आली.

दर्जेदार सेवेसाठी प्रसिद्ध असलेली आणि आधुनिक व प्रमाणित उपकरणांनी सुसज्ज असलेली नाशिक स्पेशालिटी लॅबोरेटरी मोठ्या संख्येने रुग्णांना अचूक आणि जलद परिणाम देण्यासाठी समर्पित आहे. ही प्रयोगशाळा नियमित चाचण्या, विशेष आणि अति-विशेष श्रेणीच्या चाचण्या आणि अत्यंत प्रगत जीनोम चाचणीसह चाचण्यांची विस्तृत श्रेणी प्रदान करेल.

यावेळी नाशिकच्या एचसीजी मानवता कॅन्सर सेंटरचे एमडी आणि सर्जिकल ऑन्कोलॉजीचे प्रमुख प्रा.डॉ. राज नगरकर म्हणाले, ऑनक्वेस्ट लॅबोरेटरीजचे आम्ही स्वागत करतो, प्रगत पॅथॉलॉजी टेस्टिंगमधील त्यांचे कौशल्य नाशिकच्या आरोग्य यंत्रणेसाठी वरदान ठरेल आणि डॉक्टर आणि रुग्णांना समान फायदा होईल. तर नाशिक कॅन्सर सेंटर अँड एपेक्स वेलेन्स, नाशिकचे कन्सल्टंट मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. शैलेश बोंडार्डे यांनी ऑनक्वेस्टसारखा प्रगत खेळाडूच समस्येच्या मूळ कारणाचे अचूक निदान करू शकतो आणि डॉक्टरांना त्यांच्या रुग्णांना योग्य उपचार देण्यास मदत करू शकतो असे सांगितले.नाशिक स्पेशालिटी लॅबोरेटरीचे संचालक डॉ. धनंजय डबीर यांनीही या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच ऑनक्वेस्टचे चीफ बिझनेस ऑफिसर दीपांशु सन्याल यांनी या सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले.

# टाकळी(विं)शिवारात देशी दारूचे दुकान चोरट्यांनी फोडले

**लासलगाव । वार्ताहर**

लासलगाव रेल्वे स्टेशन परिसरातील टाकळी(विं) शिवारात असलेल्या देशी दारूच्या दुकानाचे शटरचे कुलूप अज्ञात चोरट्यानी तोडून दुकानात प्रवेश केला व दुकानात विक्रीसाठी असलेल्या १ लाख ४२ हजार रुपये किमतीच्या देशी दारूच्या बाटल्या चोरुन नेल्याची घटना शुक्रवार व शनिवार रात्रीच्या दरम्यान घडली असून या प्रकरणी लासलगाव पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे

या बाबत पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार लासलगाव रेल्वे स्टेशन परिसरातील टाकळी(विं) शिवारात ऋषिकेश देशी दारूचे दुकान आहे.या प्रकरणी दुकानाचे व्यवस्थापक फिर्यादी सतीश चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शुक्रवारी रात्री दहा व शनिवार सकाळी सहा वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी या देशी दारूच्या दुकानाचे शटर चे कुलूप तोडून दुकानात प्रवेश केला व दुकानात विक्रीसाठी असलेल्या अंदाजे १ लाख ४२ हजार रुपये किमतीचे देशी दारूचे ४६ बॉक्स चोरुन पोबारा केला.

या प्रकरणी लासलगाव पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक राहुल वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस नाईक नवनाथ नाईकवाडे व उत्तम गोसावी करत आहे.

## 'शासन आपल्या दारी' कार्यक्रमस्थळी ३४ स्टॉलची उभारणी

**धुळे ।** 'शासन आपल्या दारी' अभियानांतर्गत धुळे येथे जिल्हास्तरीय कार्यक्रम सोमवार, १० जुलै, २०२३ रोजी दुपारी २.३० वाजता मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत एसआरपीएफ मैदान, धुळे येथे होणार आहे. याठिकाणी उपस्थित नागरीक व लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी शासनाच्या १९ विविध विभागांचे माहितीपूर्ण ३४ स्टॉल लावण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी दिली आहे.

# स्वरगंगा कार्यक्रमात रंगला भक्तिगीतांचा सुरेल संगम

**नाशिक । प्रतिनिधी**

श्री स्वामी नारायण महाराज संजीवन समाधी उत्सवात काल ( दि. ८ ) भक्तिगीतांचा सुरेल संगम श्रोत्यांनी अनुभवला. कानडे मारुती लेनमध्ये हा उत्सव सुरु आहे. सरगम म्युझिक अकादमीचे संचालक नंदकुमार देशपांडे यांनी व सहकाऱ्यांनी विविध भक्तिगीते सादर करून वातावरणात भक्तीरंगाची उधळण केली.



देवाचीया द्वारी उभा क्षणभरी, भेटीलागी जीवा लागलीसे आस, मोगरा फुलला, अमृताहूनी गोड नाम तुझे देवा, पायोजी मैने रामरतन धन पायो अशा विविध सुरेल भक्तिगीतांनी श्रोते तल्लीन झाले. स्वामी नारायण मठात झालेल्या स्वरगंगा या कार्यक्रमात अर्पिता शेजवळकर, दर्शना बडोगे, अमित गुरव यांनी स्वरसाथ केली. तालवाद्य साथ वैभव दाणी, आर्यन निकम यांनी केली. राजेश भालेराव यांच्या दमदार तबलासाथीने भक्तिगीते अधिक खुलली. यानंतर लोकप्रिय राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प.डॉ. चारुदत्त आफळे यांनी रसाळ कीर्तन सादर केले. उपस्थित मंत्रमुग्ध झाले. मोठया संख्येने श्रोते उपस्थित होते.

आज ( दि.९) सायंकाळी मोहन उपासनी यांचा वेणूनाद हा सुरेल कार्यक्रम ४ वाजता होणार आहे. सोमवारी सागर कुलकर्णी तर मंगळवारी दि.११ रोजी अमित तांबे व सहकारी गायनसेवा सादर करणार आहेत. दि.१४ पर्यंत दररोज ६.३० वाजता आफळे यांचे कीर्तन होईल.

# पहिणे बारी नजीक स्कूलव्हॅन दुचाकीच्या अपघातात ३ गंभीर जखमी, चिमुकले विद्यार्थी सुदैवाने सुखरूप

**त्र्यंबकेश्वर । प्रतिनिधी**

त्रंबकेश्वर जवळील निसर्गरम्य ठिकाण असलेल्या पहिणे बारीच्या आधी पेगलवाडी शिवारात स्कूल व्हॅन आणि पल्सर मोटर सायकल यांचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात सात शालेय विद्यार्थी किरकोळ तर अन्य तिघे जबर जखमी झाले आहेत. यात पल्सर या दुचाकी वाहनावरील जखमींचा समावेश आहे. चिखलवाडी येथील सर्वहारा इंग्लीश मिडीयम स्कुलच्या विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या व्हॅनला हा अपघात झाला.

अपघातातील जखमींना त्रंबकेश्वर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सर्व जखमींवर त्र्यंबकेश्वरच्या उपजिल्हा रुग्णालयात डॉ. लोंढे, डॉ. राहुल येवले व सहकाऱ्यांनी यांनी उपचार केले. तर दिलीप वारघडे, वय ४६, संदीप मेरांदे, वय २५ व रमेश आचारी, वय २५ हे तिघे गंभीर जखमी असून त्यांना अधिक उपचारासाठी नाशिकच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

यासंदर्भात प्रत्यक्षदर्शी आरोग्यदूत तुषार जगताप यांनी या अपघाताची माहिती तात्काळ त्रंबकेश्वर पोलिस ठाण्याला कळवली. त्यानंतर त्रंबकेश्वर पोलिसांनी क्षणाचीही उसंत न घेता घटनास्थळी धाव घेत रुग्णावाहिकेतून तर काही जखमीना तुषार जगताप यांच्या गाडीतून रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. हा अपघात दुचाकी स्वारांचे भरधाव वेगात येणाऱ्या दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने झाल्याचे प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे. दरम्यान गंभीर जखमी असलेला चालक या धक्यातून सावरल्यानंतर त्याच्या जबानीवरून गुन्हा दाखल केला जाईल अशी माहिती त्रंबकेश्वर पोलिसांनी दिली. भरधाव येणाऱ्या दुचाकीने जम्प घेऊन ती थेट व्हॅन चालकाच्या केबिनवर जाऊन आदळली. यावेळी व्हॅनमध्ये लहान-लहान विद्यार्थी होते.

# प्रेसच्या सीएसआर फंडातून बारा गावांना मिळणार घंटागाड्या

## खा. गोडसे यांच्या प्रयत्नांना यश

**नाशिक । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील गावांना कचरा उचलण्यासाठी घंटागाड्या उपलब्ध व्हाव्यात यासाठी खा. हेमंत गोडसे यांच्याकडून सुरू असलेल्या सततच्या पाठपुराव्याला यश आले आहे. इंडिया सिक्युरिटी प्रेस प्रशासनाने त्यांच्या सामाजिक दायित्व निधीतून बारा घंटागाड्यांसाठी एक कोटी आठ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. यामुळे आता येत्या काही दिवसात नाशिक तालुक्यातील बारा गावांना कचरा उचलण्यासाठी नवीन कोऱ्या घंटागाड्या उपलब्ध होणार असल्याची माहिती खा.गोडसे यांनी दिली आहे.

नासिकरोड येथील इंडिया सिक्युरिटी प्रेसच्या सामाजिक दायित्व निधीतून नाशिक लोकसभा मतदारसंघातील ६१ गावांना घंटागाड्या उपलब्ध होण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून खा. हेमंत गोडसे यांचा पाठपुरावा सुरू होता. वर्षभरापूर्वी प्रेस प्रशासनाने पाच घंटागाड्यांसाठी निधी उपलब्ध करून दिला होता. त्यानंतर खा. गोडसे यांनी अधिकच्या घंटागाड्या उपलब्ध होण्यासाठी दिल्ली येथील प्रेस प्रशासन मुख्यालयी प्रयत्न सुरू केले होते. खा. गोडसे यांच्या सततच्या पाठपुराव्याची दखल घेत प्रेस प्रशासनाने बारा घंटागाड्या खरेदी करण्यासाठी एक कोटी आठ लाख रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. निधी मंजूरीचे पत्र भारत प्रतिभूती मुद्रण तथा मुद्रण निर्माण निगम लिमिटेडच्या एचआर विभागाचे जनरल मॅनेजर प्रकाश कुमार यांनी नासिकरोड येथील इंडिया सेक्युरिटी प्रेसचे चीफ जनरल मॅनेजर यांना पाठविले आहे. आता या निधीतून नाशिक तालुक्यातील गिरणारे, सामनगाव, गोवर्धन, लहवित, संसरी, सय्यद पिंपरी, लाखलगाव, पळसे, शिंदे, जाखोरी, कोटमगाव, शेवगे-दारणा या गावांसाठी घंटागाड्या उपलब्ध होणार आहेत. यासाठी इंडिया सिक्युरिटी प्रेस युनियनच्या पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# नाशिकमध्ये राष्ट्रीय वेदशास्त्र महापरिषद वेदशास्त्र संस्कृत पुरस्कार वितरण

**नाशिक । प्रतिनिधी**

येथील महर्षी गौतम गोदावरी वेदविद्या प्रतिष्ठान, दक्षिणाम्नाय श्री श्री जगद्गुरु शंकराचार्य महासंस्थान शृंगेरी, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक यांच्यातर्फे नाशिकमध्ये राष्ट्रीय वेदशास्त्र महापरिषद आयोजित करण्यात आली आहे.

दि.१३ जुलै रोजी पंचवटीत सरदार चौकातील गोपाल मंगल कार्यालयात दुपारी १२.३० वाजता महापरिषदेला प्रारंभ होईल. दि.१४ रोजी महापरिषदेचे उद्घाटन प्रो. डॉ. हरे राम त्रिपाठी ( कुलगुरू, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक, नागपूर) यांच्या हस्ते होईल. गंगापूररोडवरील शंकराचार्य न्यासाच्या डॉ.कूर्तकोटी सभागृहात वेदशास्त्र संस्कृत पुरस्कार प्रदान सोहळा होईल. प्रतिष्ठानचे सचिव







व प्रधानाचार्य वेदाचार्य रवींद्र पैठणे निमंत्रक आहेत.

वैदिक संहिता, जन संज्ञापन व संतांची वेदनिष्ठा या विषयावर परिसंवाद होणार आहे. त्यामध्ये प्रा. हरेराम त्रिपाठी, वेदशास्त्र संपन्न गणेशशात्री द्रविड, वेदांतरत्न प्रमोदशास्त्री कुलकर्णी, स्मार्त चुडामणी शांताराम भानोसे सहभागी होतील. ज्येष्ठ पत्रकार विश्वास देवकर परिसंवादाचे संचालन करणार आहेत.

दि.१४ रोजी सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या पुरस्कार वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून दिल्लीच्या केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरु डॉ. श्रीनिवास वरखेडी उपस्थित रहाणार आहेत. त्यांच्या हस्ते सन्मान वितरित होणार आहेत. नाशिककरांनी दोन्ही कार्यक्रमांना उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

यांचा होणार गौरव

कै. भास्कर अण्णा जोशी स्मरणार्थ राष्ट्रीय वेदशास्त्र शिरोमणी पुरस्कार वाराणसीचे गणेश्वरशास्त्री द्रविड यांना प्रदान करण्यात येणार आहे. धर्मभूषण गौरीशंकर राष्ट्रीय ऋग्वेद पुरस्कार चेन्नईचे हरीहरन घनपाठी यांना, नाशिकचे वेदाचार्य शांताराम भानोसे यांना यजुर्वेदासाठी, तर सामवेद पुरस्कार बंगळुरुचे मानस मिश्रा यांना व अथर्ववेद पुरस्कार जालन्याचे दिनकर जोशी यांना प्रदान करण्यात येतील. संस्कृत सेवाव्रती राष्ट्रीय पुरस्कार रामटेकचे मधुसूदन पेंना, नाशिकच्या वैशाली वैद्य यांना जाहीर झाले आहेत. वेदमूर्ती कै. नंदकुमार हरदास वेदवेदांग पुरस्कार नाशिकचे अभयशात्री पाठक व वैदिक छात्र पुरस्कार नाशिकच्याच वेदमूर्ती सौरभ पाठक यांना देण्यात येतील. रोख रक्कम, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र असे पुरस्कारांचे स्वरूप आहे.

# संत नामदेव राष्ट्रीय पुरस्कार माजी राजदूत नवतेज सरना यांना जाहीर

## १० जुलै रोजी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते देणार पुरस्कार

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतभरात शहिद जवानांच्या कुटुंबांच्या उध्दारासाठी निस्वार्थीपणे काम करणारी कार्यरत संस्था 'सरहद' तर्फे संत नामदेव राष्ट्रीय पुरस्कार यंदा भारताचे अमेरिकेतील माजी राजदूत नवतेज सरना यांना पुण्यात भव्य दिव्य सोहळ्यात सन्मान पुर्वक देण्यात येणार आहे.



पुण्यात मुकुंदनगरातील थ्री डेस्टिनेशन, लोटस बँक्वेट हॉल येथे येत्या १० जुलै रोजी सायंकाळी ५ वाजेला सोहळ्यात माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते देण्यात येणार आहे. याप्रसंगी मुख्य अतिथी दैनिक सकाळचे संपादक संचालक श्रीराम पवार तर अतिथी म्हणून विद्याधर बाळासाहेब अनासकर तसेच नामवंत कवी वात्रटिकाकार रामदास फुटाणे उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती सरहद संस्थेचे अध्यक्ष संजय नहार, पुरस्कार समितीचे अध्यक्ष संतसिंग मोखा, तसेच समितीचे सदस्य अरुण नेवासकर यांनी पत्रकाद्वारे दिली.

सरहद संस्थेकडून सन १९९३ साली सुरू झालेला या पुरस्कारात एक लक्ष, एक हजार रूपये आणि सन्मान चिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून महाराष्ट्र आणि पंजाबचे नाते दृढ करणार्या राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर कर्तृत्व गाजवलेल्या केवळ पंजाबी व्यक्तीस प्रतिवर्षी हा पुरस्कार देण्याची परंपरा आहे.

## न्यूज कॉलम

### शिंदखेडा तालुक्यात मतदारयादीचा कार्यक्रम

धुळे । संगीत, राज्य निवडणूक आयोगाने जानेवारी ते डिसेंबर या कालावधीत मुदत संपणाऱ्या शिंदखेडा तालुक्यातील १३ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी संगणकीय प्रणालीद्वारे मतदारयादीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यात पथारे, अंजनविहीरे, मांडळ, गव्हाणे- शिराळे, होळ (प्र. बेटावद), वाडी, वाघोदे, साळवे, परसामळ - कुमरेज, कंचनपूर, कदाणे, वालखेडा व तावखेडा (प्र. बेटावद) या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी एक जुलैची मतदारयादी ग्राह्य धरली जाणार असून ३१ जुलैला प्रभागनिहाय प्रारूप मतदारयादी प्रसिद्धी करण्यात येईल. तसेच, ३१ जुलै ते सात ऑगस्टपर्यंत मतदारयादीवर हरकती व सूचना दाखल करता येतील. अकरा ऑगस्टला प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

# रेल्वे अधिकाऱ्यांच्या बैठकीत खा.गोडसे यांनी निदर्शनास आणून दिल्या समस्या

## मागण्या तातडीने मार्गी लावण्याच्या प्रशासनाला सूचना

नाशिक । प्रतिनिधी



रेल्वे आणि रेल्वे प्रवाशांचे एक अतूट नाते आहे. रेल्वेच्या वेळापत्रकावर राज्यातील लाखो नोकरदारांचे टाईमटेबल अवलंबून असते. परंतू रेल्वे विषयीच्या रेल्वे प्रवाशांच्या तक्रारी काही कमी होत नाही. यामुळे रेल्वे प्रवासी त्रस्त झाले असून त्यांचा रेल्वे प्रशासनाविषयीच्या विरोधात सूर आहे. प्रवासी केंद्रबिंदू मानून रेल्वे प्रशासनाने सोई, सुविधा देणे गरजेचे आहे. नासिक आणि विभागातील रेल्वे विषयीच्या अनेक तक्रारी वजा मागण्या असून या विषयीच्या समस्यांचा लवकरात-लवकर निपटारा करून सोयी सुविधांसह नवीन रेल्वे गाड्या सुरू करण्याची आग्रही मागणी खा.हेमंत गोडसे यांनी केली आहे.

रेल्वे विषयीच्या समस्या, तक्रारी आणि सूचना जाणून घेण्यासाठी मध्य रेल्वे प्रशासनाने त्यांच्या अख्यारित येणाऱ्या खासदारांची नागपूर येथे बैठक आयोजित केली होती. बैठकीस मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक ललवाणी, खा. हेमंत गोडसे, खा.सुभाष भामरे यांच्यासह अनेक खासदार तसेच अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलतांना खा.गोडसे यांनी रेल्वेच्या निगडित अनेक समस्या रेल्वे अधिकार्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. यानंतर खा.गोडसे यांनी नाशिकसह मध्य रेल्वेच्या अख्यारित असलेल्या मागण्यांचे निवेदन महाव्यवस्थापक ललवाणी यांना दिले.

पंचवटी एक्सप्रेस इंटरसिटी ट्रेन असल्याने रॅकची साफसफाई नियमितपणे व्हावी, राज्यराणी आणि पंचवटी एक्सप्रेसमध्ये मनमाड आणि नाशिकच्या प्रवाशांसाठी स्वतंत्र रॅक असावी, पंचवटी एक्सप्रेसमध्ये मासिक पास धारकांसाठी कोविडपूर्वी असलेला सी -३ कोच पुर्नस्थापित करावा, राज्यराणी आणि गोदावरी एक्सप्रेसला जाताना आणि येताना देवळाली कॅम्प येथे थांबा असावा, पंचवटी एक्सप्रेसमधील पासधारकांना डब्यात वाचनालय उघडण्याची परवानगी देण्यात यावी, कोविड पूर्वी भुसावळ - पुणे कल्याण मार्गे जाणारी एक्सप्रेस पुर्ननियमित करावी, प्रस्तावित नासिक -पुणे लोहमार्गाचा डीपीआर वेळेत पूर्ण करावा, रेल्वे गाड्यांचा वेग वाढण्यासाठी कसारा घाटात अद्यावत बोगदा तयार करावा, जिल्ह्यातील भाविकांसाठी नासिक येथून अजमेर एक्सप्रेस सुरू करावी, पीएम कोट्यासाठी मुंबई, पुणे येथे आरक्षण अधिकाऱ्याची नेमणूक करावी आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे.

# नाशिकमध्ये लाच घेताना पोलीस उपनिरीक्षकाला अटक

### ७ महिन्यानंतर होती सेवानिवृत्ती

नाशिक । प्रतिनिधी



नाशिक जिल्ह्यात लाचखोरीच्या वाढत्या घटना चिंताजनक बनल्या असून रोज कुठल्या ना कुठल्या विभागातील एक तरी अधिकारी किंवा कर्मचारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात सापडत आहे. काही दिवसांपूर्वी दिंडोरीच्या उपविभागीय अधिकाऱ्यावर एसीबीने कारवाई केली होती. अशातच नाशिकच्या पोलीस प्रशासनातील पोलीस उपनिरीक्षकास पंधरा हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले आहे.

नाशिकमध्ये लाचखोरीचा भस्मासुर बोकाळला असून गेल्या काही दिवसात सातत्याने लाचखोरीचे प्रकरण उघडकीस येत आहेत. दोन दिवसांपूर्वी त्र्यंबकेश्वरमध्ये दोन तलाठ्यांना लाच घेताना पकडण्यात आले होते. अशातच नाशिकच्या पोलीस दलातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. नाशिक आयुक्तालयातील नाशिक रोड पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षकास लाच घेताना एसीबीकडून रंगेहाथ पकडण्यात आले आहे. गणपत काकड असे या लाचखोर पोलीस उपनिरीक्षकाचे नाव आहे.


दरम्यान तक्रारदार आणि त्यांच्या पत्नी विरोधात नाशिक रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या दाखल गुन्ह्याच्या तपासात मदत करण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक गणपत काकड यांनी तक्रारदाराकडे पाच जुलै २०२३ रोजी २५ हजाराच्या लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती १५००० रुपयांची लाच स्वीकारताना पोलीस उपनिरीक्षक काकड यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुरुवारी दुपारी रंगेहाथ अटक केली. नाशिकरोड पोलीस स्टेशनच्या मागील बाजूस गणपत काकड हे लाच स्वीकारत असताना त्यांना पकडले. या कारवाईने नाशिक पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे. याप्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या माध्यमातून काकडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून काकड हे एसीबीच्या कोठडीत आहेत. तसेच नाशिकरोड पोलीस छुप्या पद्धतीने चालणाऱ्या अवैध धंद्यांकडे सोयीस्कर दुर्लक्ष करीत आहे.

दरम्यान तक्रारदारांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. एसीबीच्या पथकाने नेहमीप्रमाणे सापळा रचून काकडला तक्रारदाराकडून लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहाथ अटक केली. विशेष म्हणजे काकडला खात्यांतर्गत पोलिस उपनिरीक्षक पदावर बढती मिळाली होती. सेवानिवृत्तीला सात महिने बाकी असताना तो लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकला. त्याच्याविरोधात पोलिस ठाण्यात अनेक तक्रारी होत्या. या प्रकरणी नाशिकरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वॉल फोडून ट्रक धुण्यासाठी पाण्याचा सर्रास वापर

### नॅशनल वे ब्रिज वर कारवाई करा - रिपाई आंबेडकर गटाची मागणी

धुळे । प्रतिनिधी



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया,आंबेडकर गटातर्फे धुळे शहरातील साक्री रोड येथील नॅशनल वे ब्रिज वर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. याविषयी सहाय्यक आयुक्त विजय सनेर यांना देण्यात आले.

शहरातील साक्री रोड येथील समारोहम मंगल कार्यालय समोर नॅशनल वे ब्रिजच्या शेजारी पाण्याचा वॉल आहे. नॅशनल वे ब्रिजच्या मालकाने हा वॉल फोडून त्यांच्या येथे येणारे मालट्रक व ताडपत्री धुण्यासाठी पाण्याचा सर्रासपणे वापर केला जात आहे. एकीकडे धुळेकर जनतेला आठ दिवसानंतर पाणी दिले जाते. अनेक आंदोलने होऊन देखील आंदोलनाची दखल घेतली जात नाही. मात्र नॅशनल वे ब्रिजचे मालक वॉल फोडून पाणी गाड्या धुण्यासाठी वापरून लाखो लिटर पाणी वाया घालवतो आहे. याप्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात यावी या मागणीचे निवेदन धुळे जिल्हा अध्यक्ष दिनेश राज निकुंभ यांच्या हस्ते सहाय्यक आयुक्त विजय सनेर यांना देण्यात आले. यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, आंबेडकर गटाचे धुळे जिल्हा अध्यक्ष दिनेश राज निकुंभ, प्रसिद्धी प्रमुख महेश खैरनार, युवक शहर अध्यक्ष स्वप्निल मोहिते, किशोर कुवर, विनोद वाघ उपस्थित होते.

### गोताणे शाळेत शैक्षणिक स्टॉलची मांडणी

धुळे । गोताणे (ता. धुळे) येथील जिल्हा परिषद मराठी शाळेत शाळा पूर्वतयारी अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात विद्यार्थ्यांचा बौद्धिक, शैक्षणिक व सामाजिक विकास व्हावा म्हणून विविध शैक्षणिक स्टॉलची मांडणी व माहिती देण्यात आली. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा ज्योतीताई पाटील, सामाजिक कार्यकर्ते चूडामण पाटील, मुख्याध्यापक झुलाल पाटील प्रमुख पाहुणे होते. मेळाव्यात नावनोंदणी, शारीरिक, बौद्धिक, सामाजिक, भावनिक व भाषा विकास, गणन पूर्वतयारी आदी शैक्षणिक स्टॉलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना माहिती व मार्गदर्शन झाले.

# लासलगाव महसूल मंडळ अंतर्गत विविध शासकीय सेवांचे वाटप

लासलगाव । वार्ताहर

लासलगाव येथे संकल्प मंगल कार्यालयात शासन आपल्या दारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमांमध्ये महसूल विभाग,ग्रामविकास विभाग, कृषी विभाग,महिला व बालकल्याण विभाग,आरोग्य विभाग,पशुवैद्यकीय विभाग,विद्युत वितरण विभाग, पुरवठा विभाग,महा-ई-सेवा इत्यादी विभाग सहभागी झाले होते.

निवासी नायब तहसीलदार श्रीमती एस पी वायाळ यांचे अध्यक्षतेखाली कार्यक्रमाला दीप प्रज्वलनाने सुरुवात करण्यात आली.बी एस देवकाते मंडळ अधिकारी लासलगाव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले त्यानंतर वरील विभागाचे विभाग प्रमुख यांनी त्यांचे विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या सर्व योजनांची सविस्तर माहिती दिली तसेच या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या लासलगाव बाजार समितीच्या माजी सभापती तथा विद्यमान संचालक सुवर्णा जगताप,सारोळे खुर्द चे सरपंच दत्तात्रय डुकरे,कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय लासलगाव चे पर्यवेक्षक शेलार सर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले

या वेळी लाभार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रत्यक्ष लाभ देण्यात आला.यामध्ये दिव्यांगांना अंतोदय योजनेचे १० शिधापत्रिका,नवीन ०८ शिधापत्रिका,संजय गांधी,इंदिरा गांधी निराधार योजना मंजूर प्रकरणे १५,उत्पन्न दाखले, डोमेसाईल,नॉन क्रिमिलियर प्रतिज्ञापत्र ३१६,तलाठी यांचे मार्फत फेरफार नोंदी व सातबारा उतारे ३१७,आधार अपडेशन ३८,बेबी किट ०१,जन्म मृत्यू दाखले ८७,प्रतिज्ञापत्र साक्षांकन ४७ असे एकूण ८३९ दाखले

या शिबिरात लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून निवासी नायब तहसीलदार श्रीमती एस पी वायाळ, माजी जिल्हा परिषद सदस्य डी के जगताप, थेटाळे च्या सरपंच शीतल शिंदे, सहाय्यक गटविकास अधिकारी श्रीकृष्ण पाठक, विस्तार अधिकारी सोनवणे, महिला बालकल्याण पर्यवेक्षक श्रीमती पिंगटे, आरोग्य विभागातर्फे डॉ ठाकरे, पशुवैद्यकीय विभागातर्फे डॉ दत्ता मोटेगावकर, लासलगाव चे तलाठी नितीन केदार यांच्यासह मंडळातील सर्व तलाठी सर्व ग्रामसेवक, कृषी सहाय्यक अंगणवाडी सेविका, परिचारिका उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक किशोर गोसावी यांनी केले.

# राज्य महामार्गाच्या प्रश्नी आज बैठक : विष्णू जिरे

पिंपळनेर । प्रतिनिधी

येथील राज्य महामार्गाच्या प्रश्नबाबत शासनाने ज्या नोटिसा दिल्या आहेत.त्यावर मार्ग काढण्यासाठी येथील विवेकानंद वाचनालयाच्या सभागृहात आज रविवारी ९ जुलै रोजी दुपारी ४ वाजता बैठकीचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती राज्य महामार्ग रस्ता समितीचे प्रायोजक विष्णू जिरे पाटील प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात दिली आहे.

पिंपळनेर येथील राज्य महामार्ग प्रश्नी नागरिकांना नोटिसा दिल्या आहेत. त्या प्रश्नावर सर्वांगीण चर्चा करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.या प्रश्नबाबत ख्यातनाम कायदेपंडित संभाजी पगारे मार्गदर्शन करणार आहेत. या प्रश्नाचे सोडवणुकीसाठी सर्व अंगांनी विचार करून ठोस निर्णय घेतला जाणार आहे. प्रसंगी जन आंदोलनाचे स्वरूप देणे,कायदेशीर पेक्षा राजकीय दबाव तंत्र वापरणे आदी ,या क्षेत्रातील तज्ञ मंडळीचे मार्गदर्शन घेतले जाणार आहे.असाच प्रश्न जेथे उदाभवला तेथे कोणत्या मार्गाने सोडविणार ही बाब यावेळी मांडली जाणार आहे. विष्णू जिरे पाटील प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात दिली आहे.

# पोलीस पाटलांनी गावात निपक्ष पक्ष काम पाहावे : ज्ञानेश्वर सपकाळे

चिमठाणे । प्रतिनिधी

शासकीय योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी पुढाकार घ्यावा असे देखील तहसीलदार ज्ञानेश्वर सपकाळे यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील पोलीस पाटील हा महसूल व गुह विभागाचा प्रशासनाचा महत्त्वाचा घटक आहे. म्हणून गावात पोलीस पाटलांनी काम करताना निपक्षपातीपणे काम करून आपली जबाबदारी पार पाडावी तसेच आगामी येणाऱ्या निवडणुकीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी गावात शांतता अबाधित राहण्यासाठी महत्त्वाची



भूमिका बजवावी.शासनाच्या विविध योजना सामान्य जनतेपर्यंत पोहोविणयासाठी प्रयत्न करावा. गावातील शेतकरी यांना ई पिक पाहणी तसेच पिक विमा साठी शेतकऱ्यांना जनजागृती करून सहकार्य करावे व शासन आपल्या दारी या योजनेची माहिती सर्व सामान्यां जनतेपर्यंत पोचवावी. या साठी मार्गदर्शन करण्यात आले. शिदखेडा येथील तहसीलदार ज्ञानेश्वर सपकाळे यांनी शिंदखेडा येथील तहसील कार्यालयात आयोजित बैठकीत पोलीस पाटलांचा बैठकीत मार्गदर्शन करताना सांगितले.

### गराड येथे कांदाचाळीस आग

धुळे । कांद्याला अपेक्षित दर मिळवून जास्तीचे पैसे मिळविण्याचे शेतकऱ्यांचे स्वप्न भंग झाले. त्यात गरताड (ता. धुळे) येथे चाळीत साठविलेल्या कांद्याला आग लागली. यात दीडशे ते दोनशे क्विंटल कांदा जळून खाक झाला. परिणामी शेतकरी राजेंद्र पाटील यांचे मोठे नुकसान झाले आहे. पंचनामा करून तातडीने मदत मिळावी, अशी मागणी त्यांनी केली. यंदा अपेक्षित कांद्याचे उत्पन्न हाती आले. परंतु, बाजार समितीत दर नसल्याने शेतकऱ्यांनी चाळीत कांदा साठवून ठेवला. शेतकरी पाटील यांच्या कांदा चाळीत झालेल्या घटनेत आगीने रौद्ररूप धारण केले. त्यात सर्व कांदा जळून खाक झाला.

# पुंडलिक चौधरी पिंपळनेर रत्न पुरस्कार समितीची आज बैठक

पिंपळनेर । प्रतिनिधी

पिंपळनेर शहर विकासासाठी भरीव योगदान दिलेल्या व विकासाचे व्हिजन असणाऱ्या नागरिकांसाठी दिला जाणारा पुंडलिक संपत चौधरी पिंपळनेर रत्न पुरस्कार समितीची महत्त्वपूर्ण बैठक विवेकानंद वाचनालयाच्या सभागृहात आज सकाळी दहा वाजता होणार आहे. अशी माहिती या पुरस्कार समितीचे सचिव विष्णू जिरे यांनी दिली.

पत्रकाचा आशय असा- पिंपळनेर चा सर्वांगीण विकासासाठी ज्याचे दृश्य योगदान आहे,यासाठी हा पुरस्कार दिला जातो.मूळ पिंपळनेर चे मालेगाव स्थित ज्येष्ठ पत्रकार,लेखक,वक्ते भगवान बागुल यांनी त्यांचे वडील पुंडलिक संपत चौधरी यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार प्रायोजित केला असून,रोख रक्कम, चषक, शाल, श्रीफळ हे पुरस्काराचे स्वरूप आहे. देश सेवा व समाजसेवेची प्रेरणा युवकांना निर्माण व्हावी म्हणून या पुरस्काराचे वितरण स्वतंत्रादिनी करण्यात येते.या बैठकीच्या अध्यक्षस्थानी ख्यातनाम कायदेपंडित संभाजी पगारे राहतील. अशी माहिती या पुरस्कार समितीचे सचिव विष्णू जिरे यांनी दिली.

# धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीचे आवार हायमॅस्कच्या लख्ख प्रकाशाने उजळून निघाले

धुळे । प्रतिनिधी

**तांत्रिक कारणाने बंद पडलेले बाजार समितीतील हायमॅक्स सुरू झाल्यामुळे धुळे बाजार समिती लख्ख प्रकाशाने उजळून निघाली आहे. येथील हायमॅक्स सुरू झाल्याने शेतकरी व व्यापाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. यामुळे अंधाराचा फायदा घेऊन होणाऱ्या चोऱ्यांना काही प्रमाणात चाप बसणार आहे. संपूर्ण बाजार समितीचे आवारात एकूण ८ हाय मॅक्स कार्यान्वित करण्यात आले आहेत.**



धुळे बाजार समितीवर कॉंग्रेस पक्षाचे नवीन संचालक मंडळ आल्याने शेतकरी हिताचे निर्णय घेतले जात आहेत. धुळे ग्रामीणचे आमदार कुणाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली सभापती बाजीराव पाटील आणि त्यांच्या संचालक मंडळ बाजार समितीमध्ये धोरणात्मक निर्णय घेत आहे. शेतकरी व व्यापाऱ्यांना सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात तसेच बाजार समितीचा विकास व्हावा यासाठी महत्त्वाचे निर्णय घेत त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी केली जात आहे. धुळे बाजार समितीमध्ये धुळे, जळगाव, नंदुरबार जिल्ह्यातील शेतकरी आपला शेतीमाल विक्रीसाठी आणत असतात त्याअनुषंगाने या ठिकाणी रात्रभर शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांची वर्दळ सुरू असते. शेतीमालाची ने-आण करण्यासाठी वाहने व कर्मचारी रात्रीचेही कार्यरत असतात. रात्रीच्या अंधारामुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालाची उचल-ठेव करतांना गैरसोय होत होती. येथील हायमॅक्स सुरू झाल्यामुळे उजेडाअभावी होणारी गैरसोय आता दूर झाली आहे. दरम्यान रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन भुरट्या चोऱ्यांचेही प्रमाण वाढले होते. यामुळे शेतकरी आणि व्यापाऱ्यांच्या शेतीमालाचे मोठे नुकसान होऊन त्यांना आर्थिक फटका सहन करावा लागत होता. बाजार समितीतर्फे हायमॅक्स कार्यान्वित झाल्याने आता भुरट्या चोऱ्यांनाही पायबंध लागणार आहे. परिणामी शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. बाजार समितीतील हायमॅक्स कार्यान्वित झाल्यानंतर नुकतेच हायमॅक्स सुरु करून त्याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. यावेळी बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील, उपसभापती योगेश पाटील, संचालक एन. डी. पाटील,नाना शिंदे, महादेव परदेशी,प्रभारी सचिव देवेंद्र पाटील,सहाय्यक सचिव विशाल आव्हाड, देवेंद्रसिंग सिसोदिया आदी उपस्थित होते.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438, प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518, सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# नवीन रेल्वेगाड्या सुरु करा : खा. गोडसे यांची मागणी















नाशिक
। नाशिक रेल्वे आणि रेल्वे प्रवाशांचे एक अतूट नाते आहे. रेल्वेच्या वेळापत्रकावर राज्यातील लाखो नोकरदारांचे टाईमटेबल अवलंबून असते. परंतू रेल्वे विषयीच्या रेल्वे प्रवाशांच्या तक्रारी काही कमी होत नाही. यामुळे रेल्वे प्रवासी त्रस्त झाले असून त्यांचा रेल्वे प्रशासनाविषयीच्या विरोधात सूर आहे. प्रवासी केंद्रबिंदू मानून रेल्वे प्रशासनाने सोई, सुविधा देणे गरजेचे आहे. नासिक आणि विभागातील रेल्वे विषयीच्या अनेक तक्रारी वजा मागण्या असून या विषयीच्या समस्यांचा लवकरात-लवकर निपटारा करून सोयी सुविधांसह नवीन रेल्वे गाड्या सुरू करण्याची आग्रही मागणी खा.हेमंत गोडसे यांनी केली आहे. रेल्वे विषयीच्या समस्या, तक्रारी आणि सूचना जाणून घेण्यासाठी मध्य रेल्वे प्रशासनाने त्यांच्या अख्यारित येणाऱ्या खासदारांची नागपूर येथे बैठक आयोजित केली होती. बैठकीस मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक ललवाणी, खा. हेमंत गोडसे, खा.सुभाष भामरे यांच्यासह अनेक खासदार तसेच अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलतांना खा.गोडसे यांनी रेल्वेच्या निगडित अनेक समस्या रेल्वे अधिकार्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. यानंतर खा.गोडसे यांनी नाशिकसह मध्य रेल्वेच्या अख्यारित असलेल्या मागण्यांचे निवेदन महाव्यवस्थापक ललवाणी यांना दिले. पंचवटी एक्सप्रेस इंटरसिटी ट्रेन असल्याने रॅकची साफसफाई नियमितपणे व्हावी, जिल्ह्यातील भाविकांसाठी नासिक येथून अजमेर एक्सप्रेस सुरू करावी, पीएम कोट्यासाठी मुंबई, पुणे येथे आरक्षण अधिकाऱ्याची नेमणूक करावी आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे.

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# होळनांथे येथील चौधारा माता मंदिरात भक्तांचा मेळावा

















होळनांथे। होळनांथे येथील चौधरा आई मंदिरात गुरुपौर्णिमा निमित्ताने गुरु शिष्यांचा व भक्तांचा मेळावा उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाला. होळनांथे, अजदे बु येथे गुरुपौर्णिमा निमित्त परिसरातील सर्व भगत, गुरु शिष्य एकत्र येत गुरूंविषयी स्नेहभाव व्यक्त करण्यात आला. सुरुवातीला संपूर्ण गावातून गुरूंची मिरवणूक काढण्यात आली. तदनंतर अजंदे बुद्रुक (होळनांथे) येथील चौधरा आई मंदिरात गुरु शिष्य मेळावा संपन्न झाला. यावेळी गुरुंनी आपल्या शिष्यांना मार्गदर्शन करून कानमंत्र दिला. तर शिष्यांनी आपल्या गुरुचे चरण स्पर्श करून आशीर्वाद घेतला. तदनंतर भजन सत्संग होऊन भोई समाज बांधवांकडून आयोजित स्नेहभोजनाने कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमास अमळनेरलयेथील चिंतामण भगत, होळनांथे येथील सरलाल भगत, कापडणे येथील शांताराम भगत, मांजरोद येथील कालू भगत यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास भोई समाजाचे अध्यक्ष गुलाब भोई , सुरेश भोई, दिगंबर भोई, मधुकर भोई, दिपचंद भोई, रुपचद भोई, सिताराम भोई, सुकलाल भोई, रामदास भोई, भटु भोई तसेच समाज बांधवांचे सहकार्य लाभले.

संकलर्न :योगेश पाटील, होळनांथे